

मा. नगरसेविका अनुराधा गोरखे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 12/09/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 216 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# उद्योग आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र सर्वोत्तम राज्य




मुख्यमंत्री

मुंबई : महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम आहे. 'इज ऑफ ड्युईंग बिझनेस'अंतर्गत राज्यात गुंतवणूक आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जियो वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे इंडिया-ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स (आयएबीसीए) ग्लोबल फोरम लिडर्स मीट आणि सीईओंसोबत राऊंटटेबल कॉन्फरन्स वेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तत्पर असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन विविध क्षेत्रांविषयी नवीन धोरण आखत आहे. येत्या काळात १४ क्षेत्रांसाठीची धोरणे जाहीर होणार आहेत. त्यामध्ये सेवा क्षेत्राचा समावेश आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये सेवा क्षेत्राचा मोठा वाटा आहे. उद्योजकांना गुंतवणूकदारांना अडचणी येऊ नयेत सर्व परवानग्या लवकर प्राप्त करता याव्यात या साठी मैत्री पोर्टल निर्माण करण्यात आले आहे.

एक खिडकी योजना असून उद्योजकांना राज्यात गुंतवणूक करताना चांगला अनुभव यावा यासाठी प्रयत्नशील असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इज ऑफ ड्युईंग बिझनेस मध्ये नव्याने सुधारणा करण्यात येत आहेत. गुंतवणुकीच्या नवीन संकल्पना राबवण्यात येत आहेत. राज्यात एक्सप्रेस वे चे जाळे उभारले जात आहे. वाढवण बंदरामुळे राज्य सागरी व्यापार क्षेत्रात महत्वाचा भागीदार असणार आहे. संपूर्ण राज्यातील महत्त्वाची ठिकाणे सहा तासाच्या अंतराने वाढवण बंदराशी जोडली जात आहेत. राज्यात सांडपाणी व्यवस्थापन, त्यावरील प्रक्रिया, सौर ऊर्जा, पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. त्याचा ऑस्ट्रेलियातील उद्योगांनी फायदा घ्यावा. या क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा. पुणे येथे नवीन विमानतळ उभारण्यात येत आहे. त्यामुळे पुणे शहराच्या विकासाला आणखी गती मिळेल. पुण्यात जलद वाहतुकीसाठी पायाभूत सुविधांचे नवनवीन प्रकल्प उभारण्यात येत आहेत. शासन उद्योग आणि गुंतवणूकदारांसाठी सकारात्मक निर्णय घेत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या राऊंड टेबल कॉन्फरन्सपूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी निमंत्रित व उद्योगांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ऑस्ट्रेलिया हा शिक्षण क्षेत्रातील एक अग्रगण्य देश आहे. अनेक भारतीय विद्यार्थी तिथे शिक्षणासाठी जातात. आता हेच शिक्षण नवी मुंबई येथील 'एज्यूसिटी' मध्ये मिळणार आहे.

तसेच गोंडवाना विद्यापीठाशी कुर्निल विद्यापीठाने केलेल्या करारामुळे खाणकाम क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे शिक्षण उपलब्ध होऊन त्याचा फायदा गडचिरोली जिल्ह्यातील लोह उद्योगाला होईल. गडचिरोली ही देशाची लोह राजधानी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी कर्ज धोरण योजनेचा लाभ द्या

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मंत्री आदिती तटकरे

मुंबई : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामध्ये वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनेच्या लाभार्थी महिलांना व्यवसाय सुरू करणे व आर्थिकरित्या सक्षम करण्यासाठी विशेष कर्ज धोरण राबविण्यात येत आहे.

या कर्ज योजनेशी सांगड घालण्यासाठी महामंडळांनी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी करार करावा, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.मुंबई बँकेने सुरू केलेल्या विशेष कर्ज योजना, अंगणवाडी बांधकाम संदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या. यावेळी मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार चित्रा वाघ, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, सहसचिव वि. रा. ठाकूर, वित्त विभागाच्या सहसचिव स्मिता निवतकर, सहसचिव मु. प्र. साबळे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रताप पवार, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक आनंद लोमटे आदी उपस्थित होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, मुंबई बँकेला व्याज परतावा योजनांसाठी प्राधिकृत करून तातडीने सामंजस्य करार करावा.

महामंडळाच्या व्याज परतावा योजनेच्या लाभार्थी महिलांना लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणार असल्याने यांना अपात्र ठरवता येणार नाही.

यासंदर्भात विशेष सूचना जारी करण्यात याव्यात. या योजनेच्या माध्यमातून मुंबईतील पात्र महिलांना आर्थिकरित्या सक्षम करण्यास सहकार्य लाभणार आहे.मुंबई बँकेच्या या उपक्रमांतर्गत महिलांना एक लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळणार आहे. यामध्ये ५ ते १० महिला एकत्र येऊन व्यवसाय करू शकतात. ₹१०,००० ते ₹१,००,००० पर्यंत कर्ज उपलब्ध करण्यात येणार आहे, असे मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी सांगितले.

मुंबई बँकेची मुंबईत एकूण १६.०७ लाख बचत खाती आहेत. त्यापैकी 'माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत ५३,३५७ महिलांची झिरो बॅलन्स खाती उघडली.

पात्र महिलांना शासनाकडून दरमहा ₹१५०० थेट खात्यात जमा होत आहेत.

# वाकड–ताथवडे परिसरात महापालिकेची अतिक्रमण निर्मूलन मोहीम

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या १८ मीटर रस्त्यावरील ४३ झोपड्यांचे सुमारे ३८ हजार ७५० चौरस फुटांवरील बांधकाम निष्कासित केले.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्यालय अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली करण्यात आलेल्या या कारवाईत कार्यकारी अभियंता सुनिल शिंदे,राजेंद्र शिंदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने काळाखडक, वाकड येथील स. नं. १२४/१ या मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस लागून असलेल्या मंजूर विकास योजनेतील भूमकर चौक, वाकड येथील ताथवडे हद्दपर्यंत १८ मी. रस्त्याने बाधित होणाऱ्या २०० मीटर लांब व १८ मीटर रुंद असलेल्या सुमारे ३८ हजार ७५० चौरस फूट क्षेत्रामध्ये ४३ झोपड्या निष्कासित करण्यात आल्या. ड क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, प्रशासन व स्थापत्य, शहरी दळणवळण विभाग, नगररचना विभाग, विद्युत विभाग, अतिक्रमण विभाग, अग्निशामक व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांनी संयुक्तपणे ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये सदर रस्ता रुंदीकरणातील अनधिकृत झोपड्या/वीट बांधकाम ड क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाच्या ४ पोकलेन्ड, ४ जेसीबी, ६ डंपर व २० मजुरांच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले.

कोटपिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकास योजना आणि सार्वजनिक सुविधांच्या अंमलबजावणीस अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

वाकड-ताथवडे परिसरात १८ मीटर रस्त्याला अडथळा ठरणारे अतिक्रमण हटवण्यात आले आहे. सदर रस्त्याचे काम त्वरित सुरू करण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

# 30 सप्टेंबरपूर्वी ऑनलाइन मालमत्ता कर भरा आणि मिळवा 4 टक्के सवलत!

## पिंपरी चिंचवड महापालिकेची योजना, नागरिकांना वेळेवर कर भरण्यासाठी प्रोत्साहन

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी मालमत्ता करावर विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे.

ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांना ३० सप्टेंबरपर्यंत मालमत्ता कर ऑनलाइन भरून या सवलतीचा लाभ घेता येणार आहे.

शहरातील विकासकामे, सुविधा व सेवांची अखंडित अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांनी वेळेवर कर भरणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी वेळेवर मालमत्ता कर भरावा, असे आवाहन सातत्याने महापालिकेच्या वतीने करण्यात येत असते.

तसेच वेळेवर मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी विविध सवलती देखील जाहीर करण्यात येतात.

आता महापालिकेने ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना चालू वर्षाच्या सामान्य करावर थेट ४ टक्के सवलत देऊ केली आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**असा भरा ऑनलाइन कर -**

**•पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

**•मुख्य पृष्ठावरील 'नागरिक' या पर्यायावर क्लिक करा आणि 'मालमत्ता कर विभाग' येथे जा.**

**•त्यानंतर मालमत्तेला जोडलेला मोबाईल क्रमांक किंवा मालमत्ता क्रमांक टाका**

**•त्यानंतर तुमच्या मोबाईलवर एक ओटीपी (OTP) येईल.**

**तो ओटीपी टाकल्यानंतर, 'बिल भरा' हा पर्याय निवडा आणि आपल्या मालमत्ता**

# राष्ट्रीय अभियंता दिनानिमित्त रायफल नेमबाजी स्पर्धा उत्साहात संपन्न-अरुण पाडुळे

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी – राष्ट्रीय अभियंता दिनानिमित्त पिंपरी चिंचवड राष्ट्रीय रायफल प्रशिक्षण केंद्रात अरुण पाडुळे स्पोर्ट्स फाउंडेशन आणि पिंपरी चिंचवड ज्युनिअर इंजिनिअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने १० मीटर रायफल नेमबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

ही स्पर्धा कृष्णा नगर येथील स्वामी विवेकानंद क्रीडांगणा जवळील पिंपरी चिंचवड राष्ट्रीय रायफल नेमबाजी प्रशिक्षण केंद्रात पार पडली.या स्पर्धेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील १०० हून अधिक अभियंत्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि खेळ स्पिरिट जपत करण्यात आले.

स्पर्धेअंतर्गत विविध गटांमध्ये विजेत्यांची निवड करण्यात आली असून, सर्व सहभागी अभियंत्यांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात येणार आहे.

# पुत्रप्राप्तीच्या बतावणीने भोंदूकडून महिलेची तीन लाखांची फसवणूक

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : पुत्रप्राप्तीची बतावणी करुन महिलेकडून तीन लाख १५ हजार रुपये उकळणाऱ्या भोंदूला सहकारनगर पोलिसांनी अटक केली.गिरीश बलभीम सुरवसे (वय ३६, रा. शास्त्री चौक, आळंदी रस्ता, भोसरी) असे अटक करण्यात आलेल्या भोंदूचे नाव आहे. याबाबत एका महिलेने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, सुरवसेविरुद्ध महाराष्ट्र नरबळी जादूटोणा प्रतिबंधात्मक कायद्यातील विविध कलमांन्वये, तसेच अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार २६ वर्षीय महिला पुणे-सातारा रस्त्यावरील बालाजीनगर परिसरात राहायला आहे. दोन वर्षांपूर्वी तिचा विवाह झाला होता. विवाहानंतर तिला अपत्यप्राप्ती होत नव्हती. तिने वैद्यकीय उपचार घेतले होते. महिला तिच्या गावी गेली.

त्या वेळी ओळखीतील एकाने गिरीश सुरवसे याची माहिती दिली. सुरवसेला सिद्धी प्राप्त आहे.त्याच्याकडे गेल्यास पुत्रप्राप्ती होईल, असे तिला सांगण्यात आले.


पुण्यात आल्यानंतर ती सुरवसे याच्याकडे गेली. सुरवसेने तिला अंगारा दिला, तसेच लवकरच पुत्रप्राप्ती होईल, अशी बतावणी करुन तिला जाळ्यात ओढले. त्यानंतर सुरवसेने महिलेकडून वेळोवेळी पैसे उकळले.महिलेने तिचे मंगळसूत्र विकले. सुरवसेला पैसे दिले.

महिलेने पुत्रप्राप्तीसाठी मंगळसूत्र विकल्याची माहिती तिच्या पतीला मिळाली. सुरवसने फसवणूक केल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली.

पोलिसांनी सुरवसेला अटक केली. आरोपी सुरवसेने अशा प्रकारे आणखी काही महिलांची फसवणूक केल्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

# युवा पिढीने सिक्युरिटी मार्केट क्षेत्रातील करिअरच्या संधींकडे सकारात्मकतेने पाहावे - शुभायु दास

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



युवा पिढीने सिक्युरिटी मार्केट क्षेत्रातील कौशल्ये संपादित करून या क्षेत्रातील करिअरच्या संधींकडे सकारात्मकतेने पाहावे असे मत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (एनआयएसएम) चे सहाय्यक महाव्यवस्थापक शुभायु दास यांनी व्यक्त केले. चिंचवड येथील यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) च्यावतीने आयोजित परिसंवादात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सिक्युरिटीज मार्केटचे महत्त्व व आर्थिक जागरूकता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.विविध उदाहरणांचे दाखले देत शुभायु दास यांनी विद्यार्थ्यांशी अनौपचारिक संवाद साधला.याप्रसंगी विविध शैक्षणिक उपक्रम संयुक्त विद्यमाने राबविण्यासाठी एनआयएसएम व आयआयएमएस यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.याकरारावरएनआयएसएम च्यावतीने सहाय्यक

महाव्यवस्थापक शुभायु दास व आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी स्वाक्षरी केली. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक-औद्योगिक भागीदारीचे लाभ करिअरसाठी उपयुक्त ठरतील असे आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी सांगितले.कार्यक्रमाचेसूत्रसंचालन कोमल गौड आणि रिया मिरजकर या विद्यार्थिनींनी केले. तर प्रा. डॉ. मधुरा देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले.5एनआयएमएस विषयी :नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (NISM) ही २००६ मध्ये भारतातील सिक्युरिटीज मार्केट्सचे नियामक असलेल्या सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI) द्वारे स्थापन केलेली एक सार्वजनिक ट्रस्ट आहे.

ही संस्था सिक्युरिटीज मार्केट्समधील गुणवत्ता मानके वाढवण्याच्या उद्देशाने विविध स्तरांवर क्षमता निर्माण उपक्रमांची विस्तृत श्रेणी राबवते.

# मा. नगरसेविका अनुराधा गोरखे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



आमदार अमित गोरखे यांच्या मातोश्री आणि माजी नगरसेविका अनुराधाताई गोरखे यांच्या वाढदिवसानिमित्त कलारंग कला संस्थेने 'गुणवंत विद्यार्थ्यांचा व महिलांचा गौरव सोहळा' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पिंपरी-चिंचवड येथील संभाजीनगरमधील साई उद्यानात हा कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमाला नागरिकांनी विद्यार्थांसह पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाची सुरुवात प्रा. गणेश शिंदे यांच्या 'जीवन सुंदर आहे' या प्रेरणादायी व्याख्यानाने झाली. त्यांनी सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे पाहण्याचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. त्यांच्या प्रभावी विचारामुळे उपस्थितांना चांगलाच आनंद झाला. यानंतर दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या ४२८ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल अधिक प्रोत्साहन निर्माण होईल, अशी आशा आयोजकांनी व्यक्त केली.तसेच, समाजाच्या विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या ४६ पेक्षा जास्त महिला बचत गटांच्या प्रतिनिधींना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. महिलांनी सामाजिक कार्यात अधिक सक्रिय व्हावे, यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे हा या गौरव सोहळ्याचा मुख्य उद्देश होता.या कार्यक्रमात बोलताना भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांनी आगामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १० मधून श्रीमती अनुराधाताई गोरखे या उमेदवार असतील, अशी घोषणा केली. या घोषणेमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.या प्रसंगी बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले की, "हा गौरव सोहळा म्हणजे समाजप्रबोधन, शिक्षण आणि महिला सशक्तीकरण यांचा संगम आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केल्याने त्यांना प्रेरणा मिळते. तसेच,*महिलांचा गौरव करून कलारंग संस्थेने स्त्रीशक्तीचा सन्मान केला, याचा मला आनंद वाटतो. अशा कार्यक्रमांमधून समाजात चांगले विचार आणि एकतेचा संदेश पोहोचतो."तसेच माजी नगरसेविका अनुराधा गोरखे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "माझ्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेला हा कार्यक्रम केवळ सोहळा नसून, समाजातील सकारात्मक बदलाची सुरुवात आहे. विद्यार्थ्यांना आणि महिलांना प्रोत्साहन देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. हा सन्मान माझ्यासाठी समाजाचे प्रेम आणि विश्वासाचे प्रतीक आहे."हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पारपडला महिला, विद्यार्थी, पालक आणि जेष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमाला आमदार शंकर जगताप, भाजप अध्यक्ष शत्रुघ्न काटे, कामगार नेते इरफान भाई सय्यद, उद्योजक उमेश भाऊ चांदगुडे, भाजप अनुसूचित मोर्चा अध्यक्ष बापू घोलप, तसेच मोरेश्वर शेडगे, वैशाली खाडे, केशव घोळवे, सुप्रिया ताई चांदगुडे, शर्मिला ताई बाबर, कमल ताई घोलप, कुशाग्र कदम, योगेश बाबर, अमित बाबर, राजू मिसाळ, अमित गावडे, कैलास कुटे, राजू दुर्गे, गणेश लंगोटे, मनीषा शिंदे, नेताजी शिंदे, धरम वाघमारे, बाळासाहेब रसाळ, नारायण बहिरवाडे, प्रशांत शितोळे, शीतल शिंदे, उत्तम केंदळे, दिलीप दातार पाटील, खेमराज काळे, अतुल इनामदार, नाना काळभोर, सुजाताई पलांडे, आणि राजेश पिल्ले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वडगाव मावळ न्यायालयासाठी 109 कोटी उभी राहणार नवीन भव्य इमारत

## आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीत ऐतिहासिक निर्णय

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मावळ तालुक्याच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात सुवर्णपान कोरणारा महत्वाचा टप्पा वडगाव मावळ येथे नोंदवला गेला. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, वडगाव मावळ येथे न्यायमूर्ती, वरिष्ठ वकील व बार असोसिएशन यांची संयुक्त बैठक आमदार सुनील शंकरराव शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या बैठकीत नागरिकांच्या न्यायप्रवेशासाठीदीर्घकाळापासून ची उणीव भासत असलेल्या भव्य न्यायालयीन वास्तू उभारणीचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. कृषी विभागाच्या जागेवर उभारण्यात येणारी ही इमारत पुढील ५० वर्षांचा विचार करून आधुनिक व अत्याधुनिक सुविधांसह बांधली जाणार आहे

या भव्य इमारतीमुळे वडगाव मावळ व परिसरातील नागरिकांना त्वरित, सुलभ व पारदर्शक न्याय मिळविण्याचा मार्ग सुकर होणार आहे. विशेषत: ग्रामीण व दुर्बल घटकांनाही न्याय मिळविण्यात आत्मविश्वास निर्माण होईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.न्यायालयीन कामकाजात कार्यक्षमता वाढविणे, वकिलांना योग्य सुविधा उपलब्ध करणे आणि सर्वसामान्यांना न्यायालयीन वातावरणात सहज प्रवेश मिळावा हा या प्रकल्पामागील मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.या बैठकीस न्यायमूर्ती डी.के.अनभुले, आर.व्ही.हुद्दार, एस.बी.काळे, एस. एस. देशमुख, एस. जी. दुबाळे, ए. एम. विभूते, एस. पी. जाधव, व्ही. आर. डोईफोडे, एस. ए. माळी, के. ए. देशपांडे, तसेच ज्येष्ठ वकील व वडगाव मावळ बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रतापराव शेलार, लीगल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड. रंजनाताई भोसले यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते. मावळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासासोबतच सामाजिक न्यायप्रणाली सक्षम करण्यासाठी आमदार सुनील शेळके सतत प्रयत्नशील आहेत.

न्यायालयीन इमारतीच्या उभारणीचा निर्णय हा त्यांच्या दूरदृष्टीचा व समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा ठोस पुरावा ठरतो.त्यांच्या पुढाकारामुळे न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक निधी, सुविधा व नियोजन योग्य पद्धतीने पार पडेल, अशी खात्री यावेळी व्यक्त करण्यात आली. या निमित्ताने वडगाव मावळ न्यायालयाला भविष्यातील न्यायनगरी बनविण्याचा मार्ग खुला झाला आहे.

या बैठकीत घेतलेला निर्णय मावळ तालुक्याच्या न्यायनगरीसाठीच नव्हे, तर संपूर्ण पुणे जिल्ह्यासाठी ऐतिहासिक व दूरगामी परिणाम घडवणारा ठरणार आहे. न्यायाच्या दारी प्रत्येक नागरिक सहज पोहोचेल, अशी नवी दृष्टी या उपक्रमातून साकार होणार आहे.